## प्रेसनोट दि. २१/०७/२०१८

**अवैधरित्या अग्निशस्त्र बाळगाणा-या रेकॉर्डवरील गुन्हेगारास दरोडा प्रतिबंधक पथक गुन्हे शाखा पुणे शहर यांचेकडून अटक करुन त्याचेकडून एक अग्निशस्त्र व १ जिवंत काडतूस जप्त करण्यात आली.**

दि.२०/०७/२०१८ रोजी दरोडा प्रतिबंधक पथक गुन्हे शाखा पुणे शहर यांचेकडील स्टाफ सहा.फौजदार दळवी, सहा.फौजदार आम्रे, पोना शैलेश सुर्वे, पोना अहिवळे, पोना ठाकरे, पोना डिसोजा, पोना स्वामी, पोशि जाधव असे हिंजवडी पोलीस ठाणेचे हद्दीत गुन्हयांना प्रतिबंध करणेचे दृष्टिने खाजगी वाहनाने पेट्रोलिंग करिता असताना पोना २१७२ शैलेश सुर्वे यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, हिंजवडी पोलीस स्टेशनचे रेकॉर्डवरील गुन्हेगार अभिषेक पारखी रा.सुतारवस्ती, सरकारी दवाखाना मागे, मानदेवी चौक, हिंजवडी ता.मुळशी जि.पुणे याचेकडे अवैध गावठी पिस्टल असून तो माणगाव येथील सरकारी दवाखान्या समोरील सार्वजनिक रोडचे कडेला बसलेला आहे. त्यानुसार दि.२०/७/२०१८ रोजी २२:४५ वा.बातमीच्या ठिकाणी अचानकपणे छापा घालून पोलीस रेकॉर्डवरील गुन्हेगार नामे अभिषेक पारखी यास सदर वेळी ताब्यात घेवून त्याची अंगझडती घेतली असता त्याचे डावे बाजूचे कमरेस खोचलेले एक लोखंडी धातूचे गावठी बनावटीचे पिस्टल मॅगिजनसह व १ जिवंत काडतूस असा ३५,२००/- रु चा माल हस्तगत करुन हिंजवडी पो.स्टे. गुरजिनं.३६७/२०१८ भारतीय हत्यार कायदा कलम ३(२५) व मुंबई पोलीस ॲक्ट कलम ३७(१)(३)सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करुन अटक करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त गुन्हे श्री.प्रदिप देशपांडे, मा.पोलीस उप-आयुक्त श्री.पंकज डहाणे, सपोआ गुन्हे १ श्री समीर शेख, दरोडा प्रतिबंधक पथकाचे पोलीस निरीक्षक राजेंद्र कदम, यांचे मार्गदशनाखाली महिला पोलीस सहा. निरीक्षक श्रीमती विदयुलता चव्हाण, सहा.फौजदार संजय दळवी, सहा.फौजदार यशवंत आम्रे, पोना. शैलेश सुर्वे, पोना.सचिन अहिवळे, पोना. संदिप ठाकरे, पोना.विल्सन डिसोजा, पोना. वैभव स्वामी, पोशि प्रविण जाधव यांनी केली.